मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# थकबाकीदाराचे अंतर्गत नळ कनेक्शन खंडित

## सोसायट्यांना मिळणार तीन दिवसांची लेखी मुदत






**। पिंपरी-चिंचवड।**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

पिंपरी- चिंचवड महापालिकेच्या वतीने कर वसुलीसाठी धडाकेबाज निर्णय घेतले जात आहे. आता उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार महापालिका सोसायटीमधील सदनिकाधारक थकबाकीदाराचे अंतर्गत नळ कनेक्शन खंडित करण्याची मोहीम राबविण्यात येणार आहे. त्यामुळे सोसायटीमधील थकबाकीदारांनी आपला थकीत मालमत्ता कर भरून महापालिकेला सहकार्य करावे असे आवाहन करण्यात आले आहे. महापालिकेच्या कर संकलन व कर आकारणी विभागाला १ हजार कोटींचे उद्दिष्ट देण्यात आले आहे. आतापर्यंत तब्बल ८६० कोटी रुपयांचा कर महापालिका तिजोरीत जमा झाला आहे. मात्र, एक हजार कोटींचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी विविध प्रकारचे प्रयत्न केले जात आहेत. आता या प्रयत्नांना उच्च न्यायालयाच्या एका निर्णयामुळे आणखी बळ मिळाले आहे. त्यामुळे आर्थिक वर्षातील उर्वरित ११ दिवसांत जास्तीत जास्त कर वसूल करण्याचे महापालिकेचे प्रयत्न सुरू आहेत. महाराष्ट्र शासन, वसई विरार महापालिकेसह इतरांविरोधात विरोधात २०२३ मध्ये मुंबई उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल करण्यात आली होती. १५ फेब्रुवारीला उच्च न्यायालयाचा निर्णय आला आहे. न्यायालयाच्या निर्णयाची प्रत पिंपरी- चिंचवड महापालिकेला नुकतीच प्राप्त झाली आहे. यापूर्वीही महापालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागाने थक बाकीदाराचे सोसायटीमधील नळ कनेक्शन खंडित करण्याबाबत पत्र दिले होते. त्यानुसार शहरातील काही मोठ्या सोसायट्यांमधील नळ कनेक्शन खंडित करण्यात आले आहेत.

उच्च न्यायालयात महापालिका मालमत्ता करासाठी नळ कनेक्शन खंडित करू शकते की नाही? या संदर्भात ही याचिका दाखल होती. या याचिकेच्या सुनावणीवेळी न्यायालयाने मालमत्ता धारक कर भरण्यास नकार देत असतील तर ही चिंतेची बाब असल्याचे महत्व पूर्ण निरीक्षण नोंदवले आहे. कर न भरता मालमत्ता धारकांना महापालिकेच्या सेवा सुविधा हव्या असतील तर आम्ही वसई विरार महापालिकेला थकबाकी वसूल करण्यासाठी कायद्याने जे काही नियम आहेत, ते वापरण्यापासून आम्ही प्रतिबंध घालणार नसल्याचे स्पष्ट केले आहे. शहरात अशा अनेक सोसायट्या आहेत ज्यामध्ये हजारो सदनिकाधारकांकडे थकबाकी आहे. मात्र, संबंधित सोसायटीमधील काही सदनिका धारकांनी मालमत्ता कर, पाणीपट्टी भरलेली असते. अशावेळी संबंधित सोसायटीचे नळ कनेक्शन खंडित करता येत नाही. त्यामुळे महापालिकेने संबंधित सोसायटीला एक विशिष्ट कालमर्यादा द्यावी. त्या सोसायटीमधील थकबाकीदाराचे जे अंतर्गत नळ कनेक्शन खंडित करण्याच्या सूचना महापालिकेने संबंधित सोसायटी धारकांना द्याव्यात. त्या सुचनेनुसार सोसायटीमधील पदाधिकाऱ्यांनी थकबाकीदाराचे नळ कनेक्शन खंडित केले नाही तर महापालिकेने स्वतः हून नळ कनेक्शन खंडित करावे.

# समाविष्ट गावातील पाण्याचा प्रश्न सुटणार

## चिखलीत जलशुद्धीकरण केंद्राची उभारणी



**। पिंपरी-चिंचवड।**

शहराची आगामी ४० वर्षांत होणारी लोकसंख्या वाढ आणि पाण्याची मागणी याचा विचार करून चिखलीत २०० दशलक्ष लिटर (एमएलडी) क्षमतेचे जलशुद्धीकरण केंद्र उभारण्यात येणार आहे. महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी या प्रकल्पाला नुकतीच मंजुरी दिली. त्यामुळे केंद्राचे काम सुरू करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. शहराची वाढती लोकसंख्या विचारात घेता आंद्रा आणि भामा आसखेड धरणातून २६७ एमएलडी पाणी उपलब्ध करण्यासाठी भाजप सत्ताकाळात प्रकल्प हाती घेण्यात आले. त्याअंतर्गत चिखली येथे १०० एमएलडी क्षमतेचा जलशुद्धीकरण प्रकल्प कार्यान्वित झाला आहे. त्याद्वारे समाविष्ट गावांसह पिंपरी-चिंचवडला पाणीपुरवठा सुरू झाला आहे. महापालिका हद्दीत १९९७ मध्ये समाविष्ट झालेल्या गावांमध्ये वाढलेली लोकसंख्या आणि पाण्याची गरज याचा विचार करता भामा आसखेड प्रकल्पांतर्गत चिखली येथे प्रस्तावित २०० एमएलडी क्षमतेच्या जलशुद्धीकरण केंद्राचे काम त्वरित हाती घ्यावे, अशी सूचना आमदार महेश लांडगे यांनी केली होती. त्यानुसार प्रशासनाने जलशुद्धीकरण केंद्राच्या प्रकल्पाला मान्यता दिली. या केंद्रामुळे चिखली, तळवडे, मोशी, चऱ्होली, दिघी, डुडूळगाव, जाधववाडी या गावांतील पाणी प्रश्न सोडवण्यास मदत होणार आहे.शहरातील आगामी ४० वर्षांतील वाढत्या नागरीकरणाचा विचार करून भामा आसखेड धरणातून थेट पाईपलाइनद्वारे पाणी पिंपरी-चिंचवड शहरात आणण्यात येणार आहे. त्या अंतर्गत १०० एमएलडी क्षमतेचे जलशुद्धीकरण केंद्र कार्यान्वित करून त्याचे लोकार्पण झाले आहे. आता चिखली येथे २०० एमएलडी क्षमतेच्या जलशुद्धीकरण केंद्राला मंजुरी मिळाली आहे. लवकरच कामाला सुरुवात होईल. डिसेंबर २०२५ पर्यंत या प्रकल्पातून तळवडे, चिखली, मोशी, चऱ्होली आणि दिघी परिसरात पाणी पुरवठा सुरू होईल, असा विश्वास आमदार लांडगे यांनी व्यक्त केला.

# किवळेकडे जाणाऱ्या रस्त्यावर विनापरवाना खोदकाम करणाऱ्या ठेकेदारावर गुन्हा दाखल

## परवानगी न घेता खड्डे करून कोंडीत भर घालणाऱ्यांवर गुन्हे दाखल

**| पिंपरी-चिंचवड | न्यूज एक्स्प्रेस मराठी।** पिंपरी चिंचवड शहरात प्रशस्त रस्ते असूनही जागोजागी वाहतूक कोंडी अशी स्थिती असून, यात विनापरवाना खड्डे खोदणाऱ्या लोकांमुळे भर पडत आहे. त्यामुळे आता वाहतूक पोलिसांकडून परवानगी न घेता खड्डे करून कोंडीत भर घालणाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्यास सुरुवात झाली आहे.मुकाई चौक ते किवळे गावाकडे जाणाऱ्या रोडवर खोदकाम करणारे मेसर्स लिपारू इन्फ्रा लिमिटेड या कंपनीचे फारुक खान, रा. साईनाथ नगर, निगडी यांच्यावर वाहतूक विभागाची परवानगी न घेता सार्वजनिक रस्त्यावर वाहनांना अडथळा होईल अशा प्रकारे खोदकाम केले म्हणून भारतीय दंड विधान संहिता कलम २८३, १८८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत चाकण, भोसरी, तळेगाव ही औद्योगिक क्षेत्र तसेच हिंजवडी, तळवडे, चिखली ही आयटी पार्क क्षेत्र आहेत. तसेच जगतगुरू संत तुकाराम महाराज यांचे देहू व संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज यांचे आळंदी क्षेत्र देखील पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत आहे. त्यामुळे या भागात वाहनांची मोठी वर्दळ असते. त्यातच एमआयडीसी आणि आयटी पार्क हिंजवडीमुळे शहरात वाहनांची मोठी वर्दळ असते. पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे यांनी शासनाकडून वाहतूक विभागासाठी स्वतंत्र



उपायुक्त पद मंजूर करून घेतले आहे. तसेच वाहतूक विभागासाठी दोन सहायक आयुक्त यांची नियुक्ती केली आहे. मात्र, स्मार्ट सिटी योजनेनुसार महापालिकेकडून रस्ते विकसित केले जात आहेत. परिणामी रस्ते अरुंद झाले असून, फुटपाथ मोठे झाले आहेत. कोंडीत भर पडण्यास हे देखील मोठे कारण आहे. महापालिका, स्मार्ट सिटी, एमआयडीसी, पीएमआरडीए आणि पाच ग्रामपंचायती तसेच तीन नगरपरिषदेचा परिसर पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या अंतर्गत येतो. त्यामुळे शासकीय या विभागांसह खासगी संस्था, व्यावसायिक, बांधकाम व्यावसायिक, ठेकेदार यांच्याकडून वेळोवेळी रस्त्यांवर खोदकाम केले जाते. याबाबत पोलिसांना पूर्वकल्पना दिलेली नसते. त्यामुळे रस्त्याचे काम सुरू असल्याने पर्यायी रस्त्यावरून वाहतूक वळवण्यासाठी पोलिसांना पुरेसा वेळ मिळत नाही. याचा थेट फटका नागरिकांना बसत असून, आता याबाबत पोलिसांनी कडक धोरण राबवण्यास सुरुवात केली आहे. एकीकडे वाहतूक सुरक्षित व सुरळीत ठेवून गतिमान करण्यासाठी पिंपरी-चिंचवड वाहतूक शाखेकडून विविध उपाययोजना केल्या जात आहेत. परंतु परवानगी न घेता रस्ते खोदकाम केल्यास आता थेट संबंधितांवर गुन्हा दाखल करण्याचे आदेश पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी दिले आहेत. पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत महत्त्वाच्या आणि अतिमहत्त्वाच्या व्यक्तींचे दौरे होत आहेत. या दौऱ्यासाठी देखील वाहतुकीत बदल करावा लागतो. नागरिकांना या वाहतूक बदलामुळे आणि रस्त्यावरील खड्डे यामुळे नागरिकांना दररोज कोंडीचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे आता विनापरवाना खोदकाम केल्यास गुन्हा दाखल करण्यास वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त विशाल गायकवाड यांनी सुरुवात केली आहे.

# शाहू उद्यान पुनर्विकासाच्या कामात १ कोटी २० लाखांचा भ्रष्टाचार

## चौकशी करून सर्व दोषींवर कारवाई करण्याची मारुती भापकर यांची मागणी

**| पिंपरी-चिंचवड | न्यूज एक्स्प्रेस मराठी।** चिंचवड शाहुनगरमधील राजर्षी शाहू उद्यानाच्या पुनर्विकासाच्या १ कोटी ६६ लाखाच्या कामात १ कोटी २० लाख रुपयांचा भ्रष्टाचार झाल्याचा आरोप करत चौकशी करून सर्व दोषींवर कारवाई करण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते मारुती भापकर यांनी पत्रकार परिषदेत केली.या पत्रकार परिषदेला मानव कांबळे, ब्रह्मानंद जाधव, सचिन पवार, सुरेश भिसे, दिलीप काकडे उपस्थित होते. भापकर म्हणाले की, शाहुनगर मधील राजर्षी शाहू उद्यानाच्या पुनर्विकासाचे काम झाले आहे. ए.आर. हार्दिक के पांचाळ याने खोटी कागदपत्रे सादर केली असताना आर्किटेक्ट म्हणून नियुक्ती करण्यात आली. पांचाळ यांनी धूर्तपणे उद्यानाच्या पुनर्विकासाच्या निविदेत विशेष अटी समाविष्ट करून निविदा तयार केल्या होत्या. या निविदेत त्याच्या भावाच्या कंपनीने अट पूर्ण केली नसतानाही निविदा मूल्यापेक्षा ४% कमी दराने मंजुर केली. निविदेमध्ये पुनर्विकासाच्या कामाचा एक भाग म्हणून समाविष्ट केलेल्या २१ बाबींचा समावेश होता. अनेकांचा काम करताना वापर केला नाही. कमी दर्जाचे साहित्य वापरले. शाहूनगर मधील राजश्री शाहू उद्यानाच्या पुनर्विकासाच्या या १ कोटी ६६ लाखाच्या निविदेमध्ये ए.आर. हार्दिक के पांचाळ यांनी फेरफार करून महापालिकेची १ कोटी २० लाखांची फसवणूक केली आहे. यामध्ये सल्लागार, ठेकेदार, अधिकारी, पदाधिकारी यांनी संगनमताने करदात्या नागरिकांच्या पैशाची लुट केली आहे. त्यामुळे आपण स्वतः हा लक्ष घालून तातडीने शाहुनगर येथील उद्यानात दौरा करून या प्रकरणाची चौकशी करावी. विभागातील पाच नागरिक व तक्रारदार म्हणून आम्ही व मनपाच्या वतीने व्हिडिओ रेकॉर्डिंग करावी. त्यानंतर तातडीने सर्व दोषींवर फौजदारी कारवाई करावी. गैरव्यहार केलेल्या सर्व स्थापत्य, उद्यान, विद्युत, लेखापरीक्षक व निविदा प्रक्रियेतील सर्व अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करावी. या झालेल्या अपहरणाच्या रक्कमा संबंधितांकडून कायद्याप्रमाणे चारपट वसूल कराव्यात, अशी मागणी आयुक्त शेखर सिंह यांच्याकडे केली आहे. याबाबत पत्रकारांना माहिती देताना सह शहर अभियंता मनोज सेठिया म्हणाले की, उद्यानाचे काम चार वर्षांपूर्वी पूर्ण झाले आहे. पैसे अदा केले आहेत. याबाबतची माहिती घेण्यात येईल. आयुक्त जे निर्देश देतील, त्यानुसार कारवाई केली जाईल.

# राज्यातील डाळिंबाच्या बागा अडचणीत?

## पाणी टंचाईमुळे राज्यातील डाळिंबाचा अंबिया बहर अडचणीत

**पुणे ।**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**
पाणी टंचाईमुळे राज्यातील डाळिंबाचा अंबिया बहर अडचणीत आला आहे. दरवर्षी अंबिया बहरात सरासरी ५० हजार हेक्टरवर फळे घेतली जातात. पाण्याअभावी यंदाच्या अंबिया बहरात जेमतेम २५ हजार हेक्टरवर फळे घेतली जाणार आहेत. उन्हाळाभर पाणी मिळण्याची शाश्वती नसल्यामुळे शेतकरी डाळिंबाचे पीक घेणे टाळत आहेत.अखिल भारतीय डाळिंब उत्पादक संघाचे अध्यक्ष प्रभाकर चांदणे म्हणाले, राज्यभरात डाळिंबाचे क्षेत्र २.६५ लाख हेक्टरवर आहे. मृग, हस्त आणि अंबिया बहारात डाळिंबाचे उत्पादन घेतले जाते. सध्या बाजारात हस्त बहरातील डाळिंबाची खरेदी- विक्री सुरू असून, हस्त बहार अंतिम टप्प्यात आहे. अंबिया बहरातील फळ छाटण्या (फळ धारणा) साधारण पंधरा डिसेंबरपासून मार्चच्या मध्यापर्यंत होतात. फळांची काढणी जूनपासून ऑगस्टपर्यंत होते.अंबिया बहरात प्रामुख्याने पुणे, नगर आणि सोलापूर जिल्ह्यांत फळे घेतली जातात. दरवर्षी साधारण ५० हजार हेक्टर फळे घेतली जातात. पण, यंदा पाण्याची मोठी टंचाई जाणवत असल्यामुळे जेमतेम २५ हजार हेक्टरवरच फळ छाटणी घेणे शक्य झाले आहे. अंबिया बहरातील फळ छाटण्या पूर्ण झाल्या आहेत. फळ छाटण्या झालेल्या बागांमध्ये फूल धारणा आणि फळ धारणा सुरू आहे. वाढते तापमान आणि पाणी कमी पडत असल्यामुळे फळ धारणा कमी होऊ लागली आहे. पाणी टंचाई आणि वाढत्या तापमानामुळे फळांचा आकार लहान राहण्याचा अंदाज आहे. सोलापूर



परिसरात कमाल तापमान ४० अंश सेल्सिअसवर गेले आहे. तापमान वाढ अशीच होत राहिल्यास इंदापूर, सांगोला आणि सोलापूर परिसरातील डाळिंब पिकाला मोठा फटका बसण्याची भीती आहे.सांगोला येथील डाळिंब उत्पादक शेतकरी दत्तात्रय येलपले म्हणाले, पुणे, नगर जिल्ह्याच्या तुलनेत सांगोला आणि सोलापूर परिसरात अंबिया बहरात कमी क्षेत्रावर फळे घेतली जातात. सांगोला तालुक्यात सिंचनाची सोय नसलेल्या भागात पाण्याची टंचाई जाणवू लागली आहे. हा हंगाम उन्हाळाभर असतो. तापमान जास्त असल्यामुळे या काळात पाण्याची गरजही जास्त भासते. यंदा डाळिंबाना उन्हाळाभर पाणी पुरेल, अशी स्थिती नाही. त्यामुळे अनेक शेतकऱ्यांनी अंबिया बहारात फळे घेणे टाळून जूनमध्ये मृग बहरात फळे घेण्याचे नियोजन केले आहे.अंबिया बहरात पाणी कमी पडण्याच्या शक्यतेमुळे शेतकऱ्यांनी फळ छाटण्या (फळधारणा) घेणे टाळले आहे. मृग बहारात फळधारणा क्षेत्रात वाढ होण्याची शक्यता आहे. पाण्याची टंचाई असल्यामुळे फळधारणा कमी होण्याची आणि फळांचा आकार लहान राहण्याचा अंदाज आहे, अशी माहिती अखिल भारतीय डाळिंब उत्पादक संघाचे अध्यक्ष प्रभाकर चांदणे यांनी दिली आहे.अखिल भारतीय डाळिंब उत्पादक संघाचे अध्यक्ष प्रभाकर चांदणे म्हणाले, राज्यभरात डाळिंबाचे क्षेत्र २.६५ लाख हेक्टरवर आहे. मृग, हस्त आणि अंबिया बहारात डाळिंबाचे उत्पादन घेतले जाते. सध्या बाजारात हस्त बहरातील डाळिंबाची खरेदी- विक्री सुरू असून, हस्त बहार अंतिम टप्प्यात आहे. अंबिया बहरातील फळ छाटण्या (फळ धारणा) साधारण पंधरा डिसेंबरपासून मार्चच्या मध्यापर्यंत होतात. फळांची काढणी जूनपासून ऑगस्टपर्यंत होते.अंबिया बहरात प्रामुख्याने पुणे, नगर आणि सोलापूर जिल्ह्यांत फळे घेतली जातात. दरवर्षी साधारण ५० हजार हेक्टर फळे घेतली जातात. पण, यंदा पाण्याची मोठी टंचाई जाणवत असल्यामुळे जेमतेम २५ हजार हेक्टरवरच फळ छाटणी घेणे शक्य झाले आहे. अंबिया बहरातील फळ छाटण्या पूर्ण झाल्या आहेत. फळ छाटण्या झालेल्या बागांमध्ये फूल धारणा आणि फळ धारणा सुरू आहे. वाढते तापमान आणि पाणी कमी पडत असल्यामुळे फळ धारणा कमी होऊ लागली आहे. .सांगोला येथील डाळिंब उत्पादक शेतकरी दत्तात्रय येलपले म्हणाले, पुणे, नगर जिल्ह्याच्या तुलनेत सांगोला आणि सोलापूर परिसरात अंबिया बहरात कमी क्षेत्रावर फळे घेतली जातात. सांगोला तालुक्यात सिंचनाची सोय नसलेल्या भागात पाण्याची टंचाई जाणवू लागली आहे. हा हंगाम उन्हाळाभर असतो. तापमान जास्त असल्यामुळे या काळात पाण्याची गरजही जास्त भासते.

# जुन्या गोष्टी न विसरण्याची शिवतारेंचे थोपटेंना आवाहन

## या भेटीमुळे बारामती लोकसभेच्या राजकारणात नवा रंग

**पुणे ।**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**
बारामती लोकसभा मतदारसंघातील उमेदवारीवरून अजित पवार यांच्याविरोधात दंड थोपटणारे पुरंदरचे माजी राज्यमंत्री विजय शिवतारे यांनी पवार यांचे ऐकेकाळचे राजकीय वैरी थोपटे यांची बुधवारी भेट घेतली. जुन्या गोष्टी विसरू नका, साथ द्या, असे आवाहन शिवतारे यांनी केले. या भेटीमुळे लोकसभेच्या राजकारणात नवा रंग भरला आहे.

थोपटे कुटुंबिया काय भूमिका घेतात, याबाबतही





उत्सुकता असून निवडणूक लढविण्याच्या निर्णयावर शिवतारे ठाम असल्याने बारामतीची निवडणूक तिरंगी होणार असल्याचे दिसत आहे.बारामती लोकसभा मतदारसंघ हा कुणाचा सातबारा नाही. गेली ५० वर्षे आम्ही तुम्हाला निवडून देतो आहे. 'तू कसा निवडून येतोस तेच पाहतो', असे म्हणणाऱ्या अजित पवारांचा बदला घेण्याची वेळ आली आहे, अशा शब्दांत शिवतारे यांनी अजित पवार यांच्याविरोधात दंड थोपटत बारामती लोकसभा निवडणूक लढविण्याची घोषणा केली होती. त्यामुळे महायुतीमध्ये वाद सुरू झाले असून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही शिवतारे यांना शांत राहण्याची सूचना केली होती. मात्र त्यानंतरही शिवतारे निवडणूक लढविण्यावर ठाम असून त्यांनी बुधवारी पवार यांचे कट्टर राजकीय वैरी माजी मंत्री अनंतराव थोपटे यांची भेट घेतली. त्यामुळे या भेटीची चर्चा बारामतीच्या राजकारणात सुरू झाली आहे.राष्ट्रवादी काँग्रेसमधील फुटीनंतर पवार कुटुंबियांसाठी बारामतीची लढत प्रतिष्ठेची झाली आहे. बारामतीची लढत विद्यमान खासदार सुप्रिया सुळे यांच्याविरोधात अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा अशी होणार असल्याचे जवळपास निश्चित झाले आहे. त्यानुसार काही दिवसांपूर्वी सुनेत्रा पवार यांनी माजी मंत्री अनंतराव थोपटे यांची भेट घेतली होती. तर शरद पवार यांच्या उपस्थितीत सुळे यांच्यासाठी भोर येथे मेळावा झाला होता. त्यानंतर शिवतारे यांनी थोपटे यांची भेट घेतल्याने थोपटे कुटुंबियांच्या भूमिकेकडे लक्ष लागले आहे.बारामती लोकसभा मतदारसंघातील उमेदवारीवरून अजित पवार यांच्याविरोधात दंड थोपटणारे पुरंदरचे माजी राज्यमंत्री विजय शिवतारे यांनी पवार यांचे ऐकेकाळचे राजकीय वैरी थोपटे यांची बुधवारी भेट घेतली.

# आत्मविश्वास नसल्यानेच मनसेची मदत

## अन्य पक्षांची मदत घेत निवडणुकीला सामोरे जावे लागत : जयंत पाटील

**पुणे ।**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने भाजपला पाठिंबा का दिला, असा प्रश्न राज्यातील जनतेला पडला आहे. मात्र आगामी लोकसभा निवडणुकीत विजयाचा आत्मविश्वास नसल्यानेच भाजपला अन्य पक्षांची मदत घेत निवडणुकीला सामोरे जावे लागत आहे, अशी टीका राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी केली. मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी केंद्रीय गृहमंत्री, भाजपचे ज्येष्ठ नेते अमित शहा यांची भेट घेतली होती. या भेटीनंतर मनसे महायुतीमध्ये सहभागी होणार असल्याची चर्चा आहे. या पार्श्वभूमीवर पुण्यात पत्रकारांशी बोलताना जयंत पाटील यांनी भाजपवर टीका केली.'भाजपकडे पुरेसे संख्याबळ आहे. मात्र त्यांना अन्य पक्षांची गरज का पडत आहे, हा प्रश्न उपस्थित होत आहे. याचा अर्थ त्यांच्याकडे विजयी होण्याचा आत्मविश्वास नाही. त्यामुळे त्यांना अन्य पक्षांची मदत घ्यावी लागत आहे हे स्पष्ट होत आहे,' असे पाटील यांनी स्पष्ट केले. राष्ट्रीय समाज पक्षाचे नेते महादेव जानकर यांना माढा लोकसभा मतदारसंघातून उमेदवारी देण्यासंदर्भात आणि वंचित बहुजन आघाडीचे संस्थापक अध्यक्ष डॉ. प्रकाश आंबेडकर यांनी दिलेल्या पत्राबाबतही पाटील यांनी भाष्य केले. ते म्हणाले, की माढा लोकसभा मतदारसंघातील पक्षाचा उमेदवार जवळपास निश्चित झाला आहे. योग्य वेळी त्याचे नाव जाहीर केले जाईल. या मतदारसंघात राष्ट्रवादी किंवा मित्र पक्षाचा सक्षम उमेदवार दिला जाईल. महादेव जानकर आमच्या संपर्कात आहेत. महाविकास आघाडीत अन्य मित्र पक्ष सहभागी असल्याने स्वतंत्रपणे जागा घोषित करता येत नाहीत. आघाडीच्या जागावाटपात जी जागा मिळेल त्या जागेवर सक्षम उमेदवार दिला जाईल. प्रकाश आंबेडकर यांनी दिलेले पत्र वाचले आहे. महाविकास आघाडीतील त्यांच्या समावेशाबाबत चर्चाही सुरू आहे. त्यामुळे त्याबाबत जास्त बोलता येणार नाही. विनाकारण जाहीर विधाने करणे योग्य नाही, असेही त्यांनी सांगितले.आमदार नीलेश लंके नगर दक्षिणमधून लोकसभा निवडणुकीसाठी उभे राहिल्यास शंभर टक्के निवडून येतील. त्यांनाच उमेदवारी द्यावी, अशी सर्वांचीच इच्छा आहे. मात्र लंके यांना तांत्रिक अडचणी निर्माण होऊ नयेत, याची दक्षता घ्यावी लागेल. योग्य वेळी सर्व सोपस्कार पूर्ण केले जातील. नगर दक्षिणमध्ये पक्षाची तुतारी निश्चित वाजेल, असेही पाटील यांनी सांगितले.



### भाजपकडे पुरेसे संख्याबळ

» मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी केंद्रीय गृहमंत्री, भाजपचे ज्येष्ठ नेते अमित शहा यांची भेट घेतली होती. या भेटीनंतर मनसे महायुतीमध्ये सहभागी होणार असल्याची चर्चा आहे. या पार्श्वभूमीवर पुण्यात पत्रकारांशी बोलताना जयंत पाटील यांनी भाजपवर टीका केली.'भाजपकडे पुरेसे संख्याबळ आहे. मात्र त्यांना अन्य पक्षांची गरज का पडत आहे, हा प्रश्न उपस्थित होत आहे. याचा अर्थ त्यांच्याकडे विजयी होण्याचा आत्मविश्वास नाही. त्यामुळे त्यांना अन्य पक्षांची मदत घ्यावी लागत आहे हे स्पष्ट होत आहे,' असे पाटील यांनी स्पष्ट केले. राष्ट्रीय समाज पक्षाचे नेते महादेव जानकर यांना माढा लोकसभा मतदारसंघातून उमेदवारी देण्यासंदर्भात आणि वंचित बहुजन आघाडीचे संस्थापक अध्यक्ष डॉ. प्रकाश आंबेडकर यांनी दिलेल्या पत्राबाबतही पाटील यांनी भाष्य केले. ते म्हणाले, की माढा लोकसभा मतदारसंघातील पक्षाचा उमेदवार जवळपास निश्चित झाला आहे. योग्य वेळी त्याचे नाव जाहीर केले जाईल. या मतदारसंघात राष्ट्रवादी किंवा मित्र पक्षाचा सक्षम उमेदवार दिला जाईल. महादेव जानकर आमच्या संपर्कात आहेत. महाविकास आघाडीत अन्य मित्र पक्ष सहभागी असल्याने स्वतंत्रपणे जागा घोषित करता येत नाहीत.

# 'शिरूर'मधून आढळराव पाटील 'राष्ट्रवादी'चे उमेदवार

## दिल्ली दौऱ्यानंतर अधिकृत घोषणेची अजित पवार यांची स्पष्टोक्ती

**पुणे ।**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**

शिरूर लोकसभा मतदारसंघातून शिवाजीराव आढळराव पाटील यांना राष्ट्रवादी काँग्रेसची अधिकृत उमेदवारी देण्याचे निश्चित करण्यात आले आहे. दिल्ली दौरा झाला की दोन ते तीन दिवसांत महायुतीचे उमेदवार ठरतील. शिवाजीराव आढळराव पाटील यांच्याबाबतचा निर्णयही दोन ते दिवसांत जाहीर होईल, असे राज्याचे उपमुख्यमंत्री, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अजित पवार यांनी जाहीर केले. आढळराव यांच्या उमेदवारीचा निर्णय सर्वांना विश्वासात घेऊन केला जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. शिरूर लोकसभा मतदारसंघासाठी राष्ट्रवादी काँग्रेसकडून शिवसेनेचे माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांचे नाव चर्चेत आहे. मात्र त्यांच्या नावाला खेडचे आमदार दिलीप मोहिते-पाटील यांनी विरोध दर्शविला होता. मात्र, अजित पवार यांचा आग्रह असल्याने मोहिते पाटील यांनी नरमाईची भूमिका घेतली होती. या पार्श्वभूमीवर पवार यांनी बुधवारी मोहिते पाटील यांची भेट घेतली तसेच काही विधानसभा मतदारसंघात मेळावेही घेतले. सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील, आमदार दिलीप मोहिते पाटील, सुरेखा मोहिते पाटील, सुरेश घुले, पक्षाचे जिल्हाध्यक्ष प्रदीप गारटकर, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा निर्मला पानसरे, तालुका अध्यक्ष कैलास सांडभोर, बाजार समितीचे सभापती कैलास लिंभोरे, खेड तालुका खरेदी विक्री संघाचे अध्यक्ष राजाराम लोखंडे, अरूण चांभारे, अनिल राक्षे, मंगल चांभारे, अरूण चौधरी, आनंदा काळे या वेळी उपस्थित होते. या मेळाव्यात दिलीप मोहिते पाटील यांनी आढळराव यांच्या विरोधातील आक्रमक भूमिका मवाळ करत पक्ष देईल त्या उमेदवाराचे काम करण्याचे जाहीर केले. दरम्यान, मेळाव्यानंतर पवार यांनी पत्रकारांशी संवाद साधला. ते म्हणाले की, दिल्ली दौरा झाला की दोन ते तीन दिवसांत महायुतीचे उमेदवार ठरतील. शिवाजीराव आढळराव पाटील यांच्याबाबतचा निर्णयही दोन ते दिवसांत जाहीर होईल. महायुतीच्या जास्तीत जास्त जागा निवडून आणायच्या आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे आणि मी असे आम्ही दिल्ली दौऱ्यानंतर बैठक घेणार आहोत. जागावाटप झाले की तिकीट जाहीर होईल असे पवार यांनी स्पष्ट केले.